महाराष्ट्र विधानसभा

पहिले अधिवेशन, २०१७

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मुंबई उपनगरातील बोरिवली पूर्व येथील जिवलापाडा,
हायवेवर पादचारी पूल बांधणेबाबत

(१) ३७३८ (२३-१२-२०१४). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील बोरिवली पूर्व येथील जिवलापाडा, हायवेवर ओव्हर ब्रिज पादचारी पूल बांधणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, या परिसरात मागोठाणे बस डेपो, टाटा पॉवर हाऊस गणेश नगर या हायवेवर अपघात होत असल्याने तेथे भुयारी पादचारी पूल बांधण्याचाही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने काय निर्णय घेतला आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१७) :(१) हे खरे नाही. तथापि, बोरावली (पूर्व) येथील देवलापाडा येथे बोरकर कंपाऊंड ते समर्पण बिल्डींग पर्यंत पश्चिम द्रुतगती महामार्गावर पादचारी पूल बांधण्याचे प्रस्तावित आहे.

(२) सदर प्रस्तावित पादचारी पूल बांधण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाने ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. परंतु, दहिसर (पुर्व) ते अंधेरी (पूर्व) पश्चिम द्रुतगती मार्ग येथे मेट्रो प्रस्तावित असल्याने मुंबई महानगर प्रकल्प विकास प्राधिकरण यांनी दिनांक १५.०७.२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

मुंबई महानगर प्रकल्प विकास प्राधिकरण विभागाला ना-हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता कळविण्यात आले आहे. सदर ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर सदर प्रस्तावित पादचारी पुल बांधण्याबाबत महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही प्राधान्याने करण्यात येईल.

(३) हे खरे नाही. याबाबतचा कोणताही प्रस्ताव महानगरपालिकेस प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई व ठाणे महानगरपालिकेच्या शाळांमध्ये विविध पदे रिक्त असल्याबाबत

(२) ५७७२ (०८-०३-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अजय चौधरी (शिवडी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या ४९ अनुदानित, ९४ विना अनुदानित अशा एकूण १४३ माध्यमिक शाळांपैकी १०५ पेक्षा अधिक शाळांमध्ये मुख्याध्यापकांची पदे रिक्त असून ती त्वरित भरण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ जानेवारी, २०१५ रोजी मा.शालेय शिक्षण मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागाच्या आरटीई नुसार महानगरपालिकेच्या ८ गटांमधील शाळात १०८६ शिक्षक व मुध्याध्यापक आवश्यक असताना आजपर्यंत १०४५ शिक्षक मुख्याध्यापक काम करित आहेत व ४१ शिक्षक कमी असल्याचे दिनांक ३ फेब्रुवारी, २०१५ रोजी व त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शिक्षक व मुख्यध्यापकांची पदे रिक्त असल्याने शिक्षणाची दुरावस्था झाली असल्याने विद्यार्थ्यांची गळती होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यार्थ्यांची गळती रोखण्यासाठी व शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता उक्त शिक्षक व मुख्याध्यापकांची पदे त्वरित भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०१७) :(१) मुंबई महानगरपालिकेच्या ४९ अनुदानित, ९४ विना अनुदानित अशा एकूण १४३ माध्यमिक शाळांपैकी १०५ पेक्षा अधिक शाळांमध्ये मुख्याध्यापकांची पदे रिक्त, आहेत हे खरे आहे. परंतु रिक्त पदे त्वरीत भरण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.शालेय शिक्षण मंत्री यांना निवेदन दिले आहे हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे. ठाणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील प्रत्यक्षात सर्व माध्यमांची एकूण ६४ शिक्षकांची पदे रिक्त आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील मुख्याध्यापकांच्या रिक्त पदी शाळेमधील शैक्षणिक अर्हताधारक सेवाज्येष्ठ शिक्षकास मुख्याध्यापक पदावा कार्यभार देण्यात आला आहे. तसेच, न्यायालयाच्या निर्णयासापेक्षा अनुदानित व विनाअनुदानित माध्यमिक शाळांमधील मुख्याध्यापकांची रिक्त पदे पदोन्नतीने भरणेबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

तसेच ठाणे महानगरपालिकेच्या उर्दू माध्यमाच्या रिक्त पदांच्या मागणीचे पत्र ठाणे महानगरपालिकेकडून संचालक, शिक्षण संचालनालय, पुणे व आयुक्त, महाराष्ट्र परीक्षा परिषद, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आले आहे. तसेच माध्यम निहाय ३० सप्टेंबर, २०१४ ची पटसंख्या निश्चिती विचारात घेऊन मुख्याध्यापक व शिक्षक यांचे समायोजन आणि नियुक्तीबाबत ठाणे महानगरपालिकेमार्फत नियमानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण शहरातील धोकादायक इमारतींबाबत

(३) २१८०३ (११-०८-२०१५). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण शहरातील धोकादायक इमारतींवरील कारवाई केवळ नोटीस बजावण्यापुरतीच सिमित राहिली असल्याने यंदाही या इमारतींना धोका राहणार असल्याची चिन्हे निदर्शनास आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारतींना तोडण्याकरिता आदेश मिळुनही कारवाई अभावी हे आदेश कागदावरच असल्याचे वास्तवसमोर आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रतिवर्षीप्रमाणे अतिधोकादायक इमारतींना नोटीस जारी करण्याचे आदेश प्रशासनाकडून करण्यात आल्याचे समजते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, धोकादायक इमारतींचा पुनर्विकास करण्याकरिता शासनाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१७) :(१) व (२) हे खरे नाही.

(३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील मोडकळीस आलेल्या धोकादायक व अतिधोकादायक इमारतींच्या बाबतीत कायदेशीर प्रक्रियेचा भाग म्हणून महानगरपालिकेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २६४ व २६५ नुसार संबंधित बांधकाम मालकास किंवा भागवटाधारकास लेखी नोटीसी बजावण्यात येतात.

(४) व (५) मुंबई महानगर प्रदेशातील बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून इतर महानगरपालिका/नगरपरिषद क्षेत्रासाठी एकात्मिक व एकसमान विकास नियंत्रण नियमावली लागू करण्याच्या अनुषंगाने शासनाने गठीत केलेल्या समितीने आपला अहवाल दि.३०/१०/२०१५ रोजी शासनास सादर केला आहे.

याअंतर्गत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे क्षेत्र समाविष्ट आहे. सदर नियमावलीमध्ये धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाबाबतची तरतूद समाविष्ट करण्याचे प्रस्तावित असून, सदरच्या विकास नियंत्रण नियमावलीचे प्ररुप प्रसिध्द करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

कांदिवली (पूर्व) येथील बानाडोंगरी सह. गृहनिर्माण झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रलंबित असल्याबाबत

(४) २९१५० (२१-०१-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली (पुर्व) येथील बानडोंगरी सह. गृहनिर्माण झोपडपट्टी पुनर्वसन योजना मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्प उभारण्यास उशीर होत असल्याबाबतच्या रहिवाशांकडून अनेक तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी बनविलेल्या परिशिष्ट दोन मध्ये आणखी एक दोन नावांचा समावेश केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजना संरक्षण खात्याचा जमिनीवर उभी राहत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानूसार दोषी विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) तसेच, सदर प्रकल्प पूर्ण होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (१८-०२-२०१७) :(१) मौजे बाणडोंगरी मालाड, (पूर्व) येथील न भू.क्र.९अ, ९अ/१ ते ५७, १२३अ या मिळकतीवरील बाणडोंगरी एस.आर.ए. सह गृह संस्थेची झोपडपट्टी पुनर्विकास (एस.आर.डी.) योजना दि. ४/४/१९९६ रोजी सादर करण्यात आली होती. नियंत्रक, गलिच्छ वस्ती, मुंबई उपनगर यांनी दि. २७/३/१९९६ अन्वये प्रमाणित परिशिष्ट-२ नुसार दि.२३/८/१९९६ रोजी आशयपत्र दिले होते. परिशिष्ट-२ मध्ये ६६७ पैकी ६४२ झोपडधारकांना पात्र करण्यात आले आहे. तद्नंतर या योजनेस झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत (एस.आर.एस) रुपांतर करुन दि. १/९/२००३ रोजी आशयपत्र दिले होते. त्यानंतर या संस्थेची अंधेरी (पश्चिम) येथील साईश्रध्दा सह.गृह संस्थेच्या योजनेसोबत एकत्रिकरण करुन दि. ३१/८/२००५ व नंतर दि. ५/४/२०१६ रोजी सुधारित आशयपत्र देण्यात आले आहे.

बाणडोंगरी एस.आर.ए. सह. गृह. संस्थेच्या झो.पु. योजनेतील ६४२ व एकत्रिकरण केलेल्या साईश्रध्दायोजनेतील १०९ अशा एकूण ७५१ पुनर्वसन सदनिकांच्या यो योजनेत ३२८ झोपडीधारकांना सदनिकांचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरित ४२३ झोपडीधारकांचे पुनर्वसन इमारत क्र. ९ मध्ये प्रस्तावित असून त्या इमारतीस दि. ९/८/२०१६ रोजी जोत्यापर्यंतच्या बांधकामास परवानगी देण्यात आली असून काम प्रगतीपथावर आहे.

(२) या योजनेसंदर्भात दि.२१/१०/२०१५ रोजीच्या तक्रार अर्जानुसार प्राधिकरणाने दि. ३०/८/२०१५ रोजी व दि. १४/६/२०१६ रोजी सुनावणी घेतल्या आहेत. या सुनावणीमध्ये नव्याने बांधण्यात येणाऱ्या पुनर्वसन इमारतीमध्ये परिशिष्ट-२ मधील ३ लाभार्थ्यांना सदनिका वाटप करण्याच्या विकासकास सुचना देण्यात आल्या असून सदनिका वाटप होईपर्यंत लाभार्थींना घरभाडे अदा करण्याचे आदेश देखिल देण्यात आले आहेत.

(३) वर नमूद केल्याप्रमाणे दि. २७/३/१९९६ च्या प्रमाणित परिशिष्ट-२ नुसार एकूण ६६७ पैकी ६४२ झोपड्या पात्र असून त्यामध्ये २ नांवाचा समावेश करण्यात आलेला नाही असा उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी, मालाड यांचा अहवाल आहे.
(४) सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजना खाजगी जागेवर राबविण्यात येत आहे असा प्राधिकरणाचा अहवाल आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.
(७) या योजनेतील पुनर्वसन बाकी असलेल्या झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यासाठी इमारत क्र.९ च्या बांधकामास वर नमूद केल्याप्रमाणे परवानगी दिली असून काम प्रगतीपथावर आहे.
(८) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यात बालमजूरीच्या निर्मुलनासाठी व्यापक धाडसत्रे राबविण्याबाबत

(५) २९२८५ (१२-०१-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथे बालमजूरी या अनिष्ट प्रथेच्या उच्चाटनासाठी जिल्ह्यातील धोकादायक उद्योगांमध्ये पॉकेटस् निश्चित करुन व्यापक प्रमाणात धाडसत्रे राबवावीत अशी सूचना जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्या सूचनेनुसार शासनाने जिल्ह्यात बालमजूरीच्या निर्मुलनासाठी व्यापक धाडसत्रे राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२७-०२-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.
करवीर तालुक्यात दि.२८/०१/२०१६ रोजी धाडसत्र आयोजित केले होते.
(२) करविर तालुक्यातील गांधीनगर व सरनोबत परिसरातील ३ विट्टभट्ट्या, २ हॉटेल आस्थापना व १ इमारत बांधकाम अशा एकूण ६ आस्थापनांमध्ये दि.२८/१/२०१६ रोजी आयोजित धाडसत्रात एकही आस्थापनेमध्ये बालकामगार काम करीत असल्याचे आढळून आले नाही.
(३) कार्यवाही करण्यात येत असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर महानगरपालिकेची मैदाने घंटागाडी पार्किंगसाठी विनापरवाना वापरल्याबाबत

(६) ३९०९१ (२०-०१-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिकेची मैदाने घंटागाडी पार्किंगसाठी विनापरवाना वापरल्या प्रकरणी महानगरपालिकेने कोणार्क कंपनीला १ कोटी ८२ लाख रुपयांचा दंड ठोठावला असल्याची घटना दिनांक २७-८-२०१५ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पार्किंगसाठी उभ्या केलेल्या गाड्या हटविणेसाठी आदेश महानगरपालिकेने दिले असतानाही आदेशाकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, कचरा उचलत नसल्यामुळे महानगरपालिकेने संबधित ठेकेदारला काळ्या यादीत टाकले होते, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, सदर कंपनीच्या विरुधात जकात नाक्यासमोर अनधिकृत सरंक्षण भिंत उभारल्या प्रकरणी महानगरपालिकेने एम आर टी-पी कायदा अन्वाये कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर कार्यालया समोर गाड्या उभ्या राहत असल्याने वाहतूकची कोंडी होवून परिसरात दुर्गंधी पसरत असल्याने नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येणार आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१७) :(१) हे खरे आहे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात घनकचरा वाहतुकीचे काम करणारे ठेकेदार मे.कोणार्क एन्व्हायरो प्रोजेक्टस प्रा.लि. हे महापालिकेच्या जागेत घनकचरा वाहतुकीची वाहन उभी करत असल्याने त्यांना रु. २,०२,५९,२००/- इतक्या रकमेचा भरणा करणेबाबत दि. १९.०९.२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(२) व (३) हेखरे नाही.
(४) व (५) उल्हासनगर महानगरपालिका महासभेमध्ये काही महापालिका सदस्यांनी कोंडवाड्याच्या जागेत कंपनीने अनधिकृतपणे वाहने उभी केल्याची बाब निदर्शनास आणून दिली होती. तथापी सद्य:स्थितीत कोंडवाडा महानगरपालिकेच्या ताब्यात असून त्या ठिकाणी कोणतीही वाहने उभी केली जात नाही.
(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

मिरा-भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील १५८ धोकादायक इमारतीच्या दुरुस्तीबाबत

(७) ४०८६५ (१७-०५-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील १५८ इमारती ३० वर्षाहून अधिक जुन्या असल्याचे माहे, २०१५ मध्ये महानगरपालिकेकडून केलेल्या सर्वेक्षणामध्ये निर्देशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तपासणीनंतर २५ धोकादायक इमारतींपैकी ३ इमारती दुरुस्ती, २ इमारतीचे निष्कासन व ४ इमारती रिकाम्या करण्यात आल्या असून उर्वरित १६ इमारती अद्यापपर्यंत रिकामी करण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर इमारती केव्हापर्यंत रिकाम्या करण्यात येणार आहेत, तसेच तेथे असलेल्या नागरीकांचे पुनर्वसन कोणत्या ठिकाणी करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.
(२) नाही.

माहे जून, २०१६ पर्यंत मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील १८ इमारती धोकादायक असल्याचे आढळून आले आहे.

या १८ इमारतीपोकी ५ इमारतींच्या बाबतीत प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. उर्वरित १३ इमारतींपैकी ५ इमारती महानगरपालिकेकडून रिकाम्या करण्यात आल्या असून ३ इमारती तोडण्याचे काम सुरु आहे व २ इमारती संपूर्णत: तोडण्यात आल्या आहेत. तर ३ इमारती रहिवास व्याप्त असून त्या रिकामी करण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(३) मुंबई महानगर प्रदेशातील (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून) सर्व महानगरपालिका / नगरपरिषदांसाठी सर्वसमावेशक व एकात्मिक विकास नियंत्रण नियमावली तयार करण्याकरिता शासनाने नियुक्त केलेल्या समितीने आपला अहवाल सादर केला आहे.

उक्त अहवालानुसार महानगरपालिका क्षेत्रासाठी नियमावलीच्या प्रारुप मसुद्याच्या अनुषंगाने संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय प्राप्त झाले आहेत. त्यानुसार सदर प्रारुप नियमावलीवर निर्णय घेण्याची प्रक्रिया शासन स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मीरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरक्षणातील जागेवर झालेले अतिक्रमण

(८) ४१४८५ (१७-०५-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मीरा भाईंदर महानगरपालिकेच्या १३ हजार चौ.मी. आरक्षणातील जागेवर बेकायदा बांधकामे होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिसरात नागरीकांसाठी मार्केट, उदयान व खेळाचे मैदान अशा सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात अशी मागणी स्थानिक नागरीकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मीरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरक्षित जागेवरील बेकायदा बांधकामे हटवून नागरीकांना सुविधा उपलब्ध होण्यासाठी शासन कार्यवाही करणार आहे वा करीत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१७) :(१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) मिरा-भाईंदर शहराच्या विकास योजनेंतर्गत सार्वजनिक वापराच्या विविध आरक्षणाने बाधित जागा विकास हक्क प्रमाणपत्राद्वारे ताब्यात घेण्याची व तद्नंतर आरक्षण विकसित करण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून सुरु असल्याचे आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे जिल्हयातील जुने धुळे परिसरात सांडपाण्यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याबाबत

(९) ४१५७० (०७-०५-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्हयातील जुने धुळे परिसरात सांडपाण्यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सांडपाण्याची समस्या सोडविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१७) :(१) जुने धुळे परिसरात सांडपाण्यामुळे नागरिकांचे आरोगय धोक्यात येत असल्याबाबत स्थानिक वृत्तपत्रात बातम्या प्रसिध्द झाल्या होत्या. तथापि, नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याची कोणतीही बाब निदर्शनास आली नाही.
(२) व (३) धुळे शहरातील सांडपाण्याचे व्यवस्थापन करणेचे अनुषंगाने भुयारी गटार प्रकल्प केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत राबविण्याचे धुळे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

संगमनेर नगरपरिषदेस (जि.नगर) शासकीय योजना मंजूर करताना भरावा लागणारा हिस्सा (लोकवर्गणी) रद्द करण्याबाबत

(१०) ४२५६७ (०५-०५-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमनेर नगरपरिषदेस (जि.नगर) शासकीय योजना मंजूर करताना भरावा लागणारा हिस्सा (लोकवर्गणी) रद्द करावा व अंदाजपत्रकाप्रमाणे अनुदान मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी संबंधितांकडे मागणी केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०१७) :(१), (२) व (३) संगमनेर नगरपरिषदेस शासकीय योजना मंजूर करताना भरावा लागणारा लोकहिस्सा माफ करणेबाबत वेळोवेळी तोंडी स्वरुपात मागणी केली असली तरी शासनाच्या योजनेच्या वित्तिय आकृतीबंधानुसार नगरपरिषद हिश्याचा निधी संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने उभा करणे क्रमप्राप्त आहे.

भू-सर्वेक्षण माहिती अहवाल (जिओग्राफीक इन्फर्मेशन सिस्टीम)
सादर करणे बंधनकारक करण्यात आल्याबाबत

(११) ४२९०० (१७-०५-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) झोपडपट्टी पुनर्वसन योजनांसाठी नव्याने सादर केल्या जाणाऱ्या प्रस्तावात यापुढे भू-सर्वेक्षण माहिती अहवाल (जिओग्राफीक इन्फर्मेशन सिस्टीम) सादर करणे बंधनकारक असल्याचा निर्णय झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नव्या पध्दतीनुसार आतापर्यंत किती झोपडपट्टी पुनर्वसन प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत वा किती प्रस्तावात विकासकांनी भू-सर्वेक्षण माहिती अहवाल दिलेला नाही, त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, भू-सर्वेक्षण अहवाल सादर करण्यास टाळाटाळ करुन झोपू योजनांना विलंब लावणाऱ्या विकासकांवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (१८-०२-२०१७) :(१) होय.
(२) व (३) या नव्या पध्दतीनुसार आतापर्यंत ६७ प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मंजूर केले आहेत. भू-सर्वेक्षण माहिती अहवाल सादर न केल्यास नवीन प्रस्ताव स्विकारण्यात येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

चायनीज फूडमध्ये बेकायदा वापरण्यात येणा-या अजिनोमोटोवरील बंदीबाबत

(१२) ४४४९४ (२८-०४-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील रस्त्यांवरील व उपहारगृहातून बेकायदा चायनीज फूड विक्री करणा-यांवर मुंबई महानगरपालिकेने बंदी घातली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चायनीज फूडमध्ये वापरण्यात येणा-या अजिनोमोटोवर बंदी घालण्याचे अधिकार किंवा महानगरपालिकेच्या नियमात तरतूद नसल्याने सदर अजिनोमोटोवरील बंदी घालण्यासाठी महानगरपालिकेने अन्न सुरक्षा, अन्न व औषध प्रशासन आयुक्तांकडे पत्राव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चायनीज फूडमध्ये बेकायदा वापरण्यात येणा-या अजिनोमोटोवरील बंदीबाबत शासनाने आतापर्यंत कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१७) :(१) हे खरे नाही.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेने, मुंबई शहरातील सर्व हॉटेल्स व हातगाड्यांवर बनविल्या जाणाऱ्या चायनीज खाद्यपदार्थांमध्ये "अजिनोमोटो" पावडर वापरण्यास राज्य शासनामार्फत तात्काळ बंदी घालण्याबाबतचा ठराव दिनांक २०.१०.२०१४ रोजी मंजूर केला आहे.

(२) हे खरे आहे.

खाद्यपदार्थांवर तसेच खाद्यापदार्थांमध्ये मिसळण्यात येणाऱ्या कोणत्याही पदार्थांवर बंदी घालण्याची तरतूद अन्न, सुरक्षा व मानदे अधिनियम २००५ च्या अधिनियमात असल्याने, सदर बंदीबाबत आयुक्त, अन्न सुरक्षा, अन्न व औषध प्रशासन यांना दिनांक १८.११.२०१४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(३) व (४) अन्न पदार्थांत वापरण्यात येणाऱ्या अजिनोमोटोचा वापर सुरक्षित आहे किंवा कसे याबाबत संशोधन करण्याबाबत अन्न सुरक्षा प्राधिकरण, नवी दिल्ली यांना कळविण्यात आले आहे.

सदर बाब केंद्रीय प्राधिकरणाच्या अखत्यारीतील आहे.

राज्यातील विहीरींचे पुर्नजीवन करण्याबाबत

(१३) ४४५११ (०५-०५-२०१६). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यासह मुंबई - ठाणे शहरात भविष्यात भेडसवणारी पाणी टंचाई दुर करण्यासाठी शहरातील नैसर्गिक, कृत्रिम विहीरीचे पुर्नजीवन करण्याची मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीत विहीरी स्वच्छ करुन त्यातील पाणी वापरासाठी आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१७) :(१) राज्यातील काही शहरांमध्ये भविष्यात भेडसावणारी पाणी टंचाई दूर करण्यासाठी कृत्रिम विहीरींचे पुनरुज्जीवन करण्याची मागणी संबंधित महानगरपालिकांकडे होत आहे.
(२) व (३) शरामध्ये पाणी टंचाईच्या काळात पाणी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने सार्वजनिक विहीरीची साफसफाई व देखभाल दुरुस्ती संबंधित महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.

मुंबई शहरातील देवनार येथील निवासस्थाने महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना मालकी हक्काने देण्याबाबत

(१४) ४५६१८ (१७-०५-२०१६). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील देवनार येथे शासकीय जमीनीवर मुंबई महानगरपालिकेतर्फे कर्मचाऱ्यांसाठी इमारती (ई.एफ.जी.एच.) बांधण्यात आलेल्या असून त्यापैकी एच टाईप इमारतीत निवासस्थाने कर्मचाऱ्यांच्या नावाने रोख रक्कम घेऊन करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित ई.एफ.जी.मधील निवासस्थाने मालकी हक्काने देण्याबाबत प्रस्ताव महापालिकेच्या सभागृहात मंजूर होऊन मालमत्ता विभागाने कर्मचाऱ्यांच्या गृहनिर्माण संस्थेस अटी व शर्तीची पूर्तता करुन त्यांचे नावे करण्याबाबत मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्ताव डीएल टु एमएस सुधार समितीला सादर करावयाचा असतानाही तो सादर न केल्याने सदरहू निवासस्थाने महानगरपालिका कर्मचाऱ्यांना हस्तांतरित केली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर निवासस्थाने महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना तातडीने देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१७) :(१) हे खरे नाही.

देवनार पशुवधगृह यांना सेवानिवासस्थान म्हणून वितरीत केलेल्या एचटाईप इमारतीतील २० पैकी १६ कर्मचाऱ्यांकडून सदनिका मालकी तत्वावर करण्यासाठी अनामत रक्कम म्हणून रु. ९४५०/- इतक्या रकमेचा भरणा महानगरपालिकेस केल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येते.

परंतु, कर्मचाऱ्यांनी महानगरपालिकेच्या एम/पूर्व विभागात अटी व शर्तीनुसार विहित कालावधीत आवश्यक असलेले करारपत्र करण्यात आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

महानगरपालिका प्रशासनामार्फत विविध धोरणात्मक बाबींबाबत ठराव सुधार समिती/ महानगरपालिका मंजूरीसाठी सादर केले जातात. परंतु सदर प्रकरणी महानगरपालिका प्रशासनाने कोणताही प्रस्ताव सादर केलेला नव्हता.

अनुज्ञा व अनुमती तत्वारील गाळे मालकी हक्क तत्वावर रुपातरीत करण्यास महानगरपालिकेने संमत करावयाच्या अटी/शर्तीसापेक्षा तात्पुरती मंजुरी देण्यासाठी व सहकारी घर बांधणी संस्थांच्या भाडेपट्ट्याचे नियमन करणाऱ्या अटी संबंधात आवश्यक प्रस्ताव आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिा यांनी सादर करावा असा ठराव महानगरपालिकेच्या सुधार समितीच्या दिनांक १०.८.१९८९ व ०१.०९.१९८९ च्या ठरावान्वये मंजूर करण्यात आला होता.

परंतु, सदर प्रस्ताव मान्य करण्यासारखा नसल्यामुळे महानगरपालिका प्रशासनाकडून असा ठराव प्रस्ताविण्यात आला नाही व सदर ठरावास वैधता प्राप्त झाली नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

महानगरपालिकेकडे असलेली तुटपुंजी निवासस्थाने व प्रतिक्षा यादीत असलेले अनेक कर्मचारी तसेच भविष्यात कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक असलेल्या निवासस्थानांचा विचार करता महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेली कर्मचारी निवसस्थाने मालकी हक्काने देणे शक्य नव्हते. त्यामुळे महानगरपालिकेच्या मंजूरीस्तव असा ठराव पाठविण्यात आला नाही.

कर्मचारी सेवा निवासस्थाने मालकी हक्काने देण्याबाबत महानगपालिकेचे कोणतेही धोरण नसून अशी निवासस्थाने मालकी हक्काने देण्याबाबत कर्मचाऱ्यांनी महानगरपालिकेविरुध्द केलेल्या विविधि यांचिकांमध्ये, सदर निवास्थान मालकी हक्काने न देण्याची ठाम भूमिका महानगरपालिकेने घेतली आहे.

तसेच शासनाच्या दिनांक १२.११.१९९२ नुसार दिनांक २५.०३.१९९१ पर्यंत किंवा तत्पूर्वी वाटप / ताबा देण्यात आलेले भूभाग सहकारी गृहनिर्माण संस्था विकाकसित करु शकतात. त्याअन्वये, कोणत्याही कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस मक्त्याने भूखंडाचे वाटप करणे महानगरपालिकेकडून बंद करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक शहरासह परिसरात स्वच्छ भारत अभियानांतर्गत
७५ ब्लॅक स्पॉट असल्याची नोंद असल्याबाबत

(१५) ४६६३१ (२८-०४-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरासह परिसरात स्वच्छ भारत अभियान राबवुनही ७५ ब्लॅक स्पॉट असल्याची नोंद आरोग्य विभागाने माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे ब्लॅक स्पॉट ज्या स्वच्छता निरिक्षकांच्या क्षेत्रात येतात त्या निरिक्षकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच सदरचे ब्लॅक स्पॉट हटविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१७) :(१) स्वच्छ भारत अभियानांतग्रत ७५ ब्लॅक स्पॉट असल्याची नोंद नाशिक महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई उपनगर जिल्ह्यातील अल्पसंख्यांक व मागासबहुल नागरी क्षेत्राचा सर्वांगीण नागरी विकास साधण्यासाठी भरीव आर्थिक तरतूद करण्याबाबत

(१६) ४७८११ (१३-०५-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगर जिल्ह्यातील उत्तर पूर्व या अल्पसंख्यांक व मागसबहुल नागरी क्षेत्राचा सर्वांगीण नागरी विकास साधण्यासाठी अंतर्गत रस्ते, जोडरस्ते, मलनित्सारण वाहिन्यांचे जाळे विस्तारण्याकरिता भरीव आर्थिक तरतूद करण्याबाबतची मागणी अल्पसंख्यांक समाजातील प्रमुखांनी, समाजसेवकांनी तसेच लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री (नगरविकास), राज्यमंत्री (नगरविकास), मा.अल्पसंख्यांक विकास मंत्री, राज्यमंत्री (अल्पसंख्यांक विकास), प्रधान सचिव (नगरविकास) तसेच महानगरपालिकेच्या संबंधित प्रशासनाधिकारी यांच्याकडे माहे डिसेंबर,२०१५ मध्ये वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१७) :(१) हे खरे नाही.
(२) शिवाजी नगर, गोवंडी येथील अंतर्गत विकसीत रस्त्यांवर २३० मी.मी., ३०० मि.मी., ४०० मि.मी. व ५०० मि.मी. व्यासाच्या मलनि:सारण वाहिन्याचे जाळे अस्तित्वात असून सदर ठिकाणचा मलप्रवाह हा घाटकोपर-मानखुर्द लिंक रोडवरील १८०० मि.मी. व्यासाच्या मुख्य मलनि:सारण वाहिनीस जोडलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

वसई-विरार उपप्रदेशातील प्रस्तावित रिंग रुटला वैतरणा रेल्वे स्थानकापासून पालघर रेल्वे स्थानकापर्यंत रेल्वेला समांतर रस्त्याच्या विकासाबाबत

(१७) ४८३४८ (०१-०५-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील जनतेस वसई-विरार उपप्रदेशातील प्रस्तावित रिंग रुटला वैतरणा रेल्वे स्थानकापासून पालघर रेल्वे स्थानकापर्यंत रेल्वेला समांतर रस्त्याच्या विकास झाल्यास सर्व सामान्य जनतेला तसेच अधिकारी कर्मचाऱ्यांना पालघर मुख्यालयात येजा करणे सोईचे होईल याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१७) :(१) होय.
(२) व (३) सदर मागणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर तपासण्यात येत आहे.

परभणी शहर महानगरपालिकेचा सहा महिन्यापासून कोट्यावधीचा निधी पडून असल्याबाबत

(१८) ४९२६४ (१६-०५-२०१६). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी शहर महानगरपालिकेला गत सहा महिन्याच्या कालावधीत दलित उत्थान योजनेचे २ कोटी रुपये, दलित वस्ती सुधार योजनेचे ६ कोटी ३६ लाख रुपये, नगरोत्थान योजनेचे ३९ लक्ष रुपये, नाविन्यपूर्ण योजनेचे ३९ लक्ष रुपये, अतिवृष्टीचे ८५ लक्ष रुपये, प्राथमिक सोयी सुविधां योजनेचे १ कोटी ९९ लक्ष रुपये, तेराव्या वित्त आयोगातील १३ कोटी ५० लक्ष रुपये, युआयडीए पाणी पुरवठा योजनेतील २७ कोटी अद्यापही पडून आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तसेच सुजल वित्तीय योजनेंतर्गत १८ लक्ष रुपये, १४ व्या वित्त आयोगाचे ८ कोटी ६८ लक्ष आणि स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत परभणी महानगरपालिकेला २ कोटी ७९ लक्ष रुपये, निधी प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, मोठ्या प्रमाणावर निधी महानगरपालिकेकडे विनावापर पडून राहण्याचे कारणे काय आहेत
(४) असल्यास, सदर निधीचा वापर करण्यासाठी महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१७) :(१) हे अंशत: खरे आहे.

दलितोत्तर योजनेचे रुपये ३.१८ कोटी, दलित वस्ती सुधार योजनेचे रु.४.२४ कोटी नाविण्यपूर्ण योजनेचे रु.३२.४० लक्ष, अतिवृष्टी योजनेचे रु.३.६१ कोटी, प्राथमिक सोयी योजनेचे रु.३९.११ लक्ष १३ व्या वित्त आयोगाचे रु.१३.५० कोटी व UIDSSMT योजनेचे रु.७५.०० लक्ष इतका निधी शिल्लक असून त्या निधी अंतर्गत ची कामे प्रगतीपथावर असून त्यावर शिल्लक निधी खर्च होणार आहे. नगरोत्थान योजनेअंतर्गत सन २०१३ पासून निधी अप्राप्त आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सुजल निर्मल योजने अंतर्गत रु.१८.०० लक्ष प्राप्त झालेला नाही. स्वच्छ महाराष्ट्र अभियाना अंतर्गत परभणी शहर महानगरपालिकेला २.७९ कोटी रुपये निधी प्राप्त झाला असुन तो खर्च झालेला आहे व १४ व्या वित्त आयोगाचा निधी रु.८.६८ कोटी प्राप्त झाला असून सदरचा निधी स्वच्छ महाराष्ट्र अभियान व UIDSSMT या योजनांवर महानगरपालिकेकडुन खर्च करण्यात येणार आहे.

(३) महानगरपालिकेत अधिकाऱ्यांची कमतरता असल्याने व या आधी नियोजन न झाल्याने निधी महानगरपालिकेत पडून राहिले आहे.

(४) अंदाजपत्रके तयार असून मंजूरीस्तव सादर आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

वरळी (मुंबई) स्थित शिवाजीनगर झोपडपट्टीला रस्ता उपलब्ध करुन देण्याबाबत

(१९) ५०१९२ (१७-०५-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी (मुंबई) डॉ.ॲनी बेझंट मार्ग येथील शिवाजीनगर झोपडपट्टीत सुमारे ४०० ते ५०० झोपडीधारक त्यांच्या कुटुंबियांसह मागील ४० वर्षापासून वास्तव्य करीत असून सदर झोपडपट्टीत जाण्यास रस्ता उपलब्ध नसल्याने आपत्कालीन परिस्थितीत सदर झोपडवासियांना तातडीने मदत पुरविणे शक्य नसल्याची गंभीर बाब माहे फेब्रुवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि शिवाजीनगर झोपडपट्टीत भविष्यात आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास तातडीने मदत करण्यासाठी रस्ता उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१७) :(१) डॉ.ॲनी बेझट मार्ग, वरळी मुंबई येथील शिवाजीनगर वसाहत ही डोंगर उतारावर वसलेली असून त्यांच्या लगतच्या जागेवर म्हाडा प्राधिकरणाच्या वसाहती तसेच सासमिरा कॉलेज आहे.

भविष्यात जर सदर वसाहतींचा पुनर्विकास म्हाडा प्राधिकरण करणार असल्यास शिवाजीनगर वसाहतीस रस्ता देण्याबाबत म्हाडाला कळविण्यात येईल.

(२) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

तिवसा (जि.अमरावती) येथील स्थानिक ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतरण होऊनही विकासकामे धीम्या गतीने सुरु असल्याबाबत

(२०) ५०३८७ (०७-०५-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) येथे स्थानिक ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतरण होऊन नव्याने स्थापित तिवसा नगरपंचायतीचे कामकाज सुरु झाले नसल्याने शहरातील नागरीकांच्या विविध समस्या वाढत असल्याने विकासकामे धीम्या गतीने सुरु असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपचांयत मुख्याधिकारी यांच्यावर मोर्शी व अमरावती येथील प्रशासकीय सेवेचा भार असल्याने तिवसा नगरपंचायतीला त्या सेवा देण्यास असमर्थ ठरत असल्याने येथील नागरीकांनी तिवसा नगरपंचायतीमध्ये कायमस्वरुपी मुख्याधिकारी देण्याची मागणी संबंधिताकडे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०१६) :(१) होय. तिवसा (जि.अमरावती) येथील ग्रामपंचायतीचे दि. ०९.०४.२०१५ रोजी नव्याने नगर पंचायत मध्ये रुपांतर झाले असून, तिवसा (जि.अमरावती) येथे डिसेंबर, २०१५ मध्ये निधी उपलब्धते अभावी विकास कामांना सुरुवात करता येणे शक्य नव्हते.

तथापि, सदर नगरपंचायतीला विकास कामाकरीता नगरोत्थान, दलितेत्तर निधी प्राप्त झाला असून या निधीमधून विकास कामे सुरु होत आहेत.

(२) व (३) नगर परिषद, दर्यापूर जि.अमरावती येथील कार्यालय अधिक्षक यांचेकडे तिवसा येथील मुख्याधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला होता.

तसेच शासन आदेश दि.१७.१२.२०१६ अन्वये मुख्याधिकारी, तिवसा नगर पंचायत या पदावर नियमित मुख्याधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मंबई महानगरपालिकेतील सुमारे २८ हजार (कायम) सफाई कामगारांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजना राबविण्याबाबत

(२१) ५३२८१ (१७-०५-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंबई महानगरपालिकेतील सुमारे २८ हजार (कायम) सफाई कामगारांसाठी असलेली आश्रम योजना रद्द करुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजना राबविण्याबाबची मागणी सफाई कामगारांकडून होत असल्याची बाब माहे मार्च, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने या कामगारांच्या घरांसाठी डॉ. बाबासाहेब श्रम साफल्य आवास योजना राबविण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१७) :(१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर मागणीच्या अनुषंगाने दिनांक २२.१०.२००८ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घन कचरा व्यवस्थापन खात्यातील ज्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्षे किंवा जास्त झालेली आहे अशा कामगारांना / वारसांना सन २००९ मध्ये एम.एम.आर.डी.ए. बिल्डींग क्र. १०, आर. एन.ए. पार्क, वाशीनाका, चेंबूर येथील ५० मोफत सदनिकांचे वाटप करण्यात आले आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या सन २०१५ साली केलेल्या नाले सफाईच्या कामात ३६ कोटीचा झालेला गैरव्यवहार

(२२) ५३५५६ (०२-०७-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०१५ साली केलेल्या नाले सफाईच्या कामात झालेल्या घोटाळ्याची मुंबई पोलीसांच्या आर्थिक गुन्हा शाखेने केलेल्या तपासात ३६ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याच प्रकरणी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशीमध्ये नाले सफाईची कामे घेणारे कंत्राटदार, गाळ उचलणारे वाहनचालक आणि कचऱ्याचे वजन करणारे कंत्राटदार यांच्या संगनमताने तब्बल १०० कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१७) :(१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात असलेल्या मोठ्या नाल्याच्या सफाईसाठी सन २०१५-१६ ते २०१६-१७ या कालावधीत देण्यात आलेल्या ३२ कंत्राटी कामातील अनियमिततेबाबत चौकशी करण्यात आली.

चौकशीअंती १३ कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या सेवेतून निलंबित करण्यात आले.

३ नालेसफाई कंत्राटदार, १ व्ही.टी.एम. कंत्राटदार आणि ८ वजनकाटा ठेकेदार यांच्या विरुध्द आर्थिक गुन्हे विभागाकडे गुन्हा दाखल केला आहे.

सर्व मोठ्या नाल्यांच्या ३२ कंत्राटासंबंधित कर्मचारी व अधिकारी यांचा सहभाग निश्चित करुन त्यांच्याविरुध्द खात्यांअंतर्गत सर्वंकष चौकशीची कारवाई करण्यात येत आहे.

२४ नालेसफाई कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्यासंदर्भात कारणे दाखवा नोटीस महानगरपालिकेमार्फत बजावण्यात आली असून पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील कोस्टल रोडला कोळी बांधवांचा व सामाजिक संस्थांचा असलेला विरोध

(२३) ५३५७२ (०२-०७-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वाहतूक कोंडीवर पर्याय व जलद वाहतूकीसाठी राज्य शासनाने महापालिकेच्या माध्यमातून १२ हजार कोटी रुपयांचा कोस्टल रोड करण्याचा शासनाने निर्णय घेतला असून दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी केंद्र शासनाने त्यास मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा प्रकल्प केवळ श्रीमंताच्या वाहनांसाठी व विकासकांच्या फायद्यासाठीच निर्माण केला असून, त्यास मुंबईतील भूमीपूत्र कोळी बांधव व सामाजिक संस्थांनी विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने अधिक चौकशी केली आहे काय व त्यानुसार काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०२-२०१७) :(१) अशी बाब नाही.

केंद्र शासन पर्यावरण वनमंत्रालयाकडील दिनांक ३०.१२.२०१५ रोजीच्या अधिसूचनेनुसार दिनांक ६.१.२०११ रोजीच्या सीआरझेड अधिसूचनेमधील तरतूदींमधील सुधारणांना मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार अशा प्रकल्पांचे बांधकाम अनुज्ञेय झालेले आहे.

(२) प्रश्नाधीन कोस्टल रोडचा विस्तृत प्रारुप प्रकल्प अहवाल हा बृहन्मुंबई महानगरपालिकेने महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जनतेच्या सूचना/हरकतीसाठी २५ जून, २०१५ रोजी उपलब्ध केलेला होता. त्यावर अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीने विरोध दर्शविलेला आहे.

(३) व (४) सदर रस्त्याच्या प्रारुप प्रकल्प अहवालामध्ये पर्यावरणीय दृष्टिकोनातून मूल्यमापन करण्यात आलेले आहे. पूर्ण प्रकल्पाचे पुनर्विलोकनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने सल्लागाराची नेमणूक केलेली आहे. या प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारींचे अवलोकन करणे व नागरिकाच्या सूचना/हरकती विचारात घेवून प्रकल्पाचे पुढील तपशीलवार अंदाजपत्रक/आराखडे बृहन्मुंबई महानगरपालिकेने तयार करणे अभिप्रेत आहे.

मुंबई महानगरपालिकेत गेल्या पाच वर्षात १९०० सफाई कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत

(२४) ५३६७८ (२६-०८-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेत मागील पाच वर्षात टी. बी., दमा व श्वसन विकाराने १९०० सफाई कामगारांचा मृत्यू झाल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेतर्फे कामगारांना हँडग्लोव्हज, गमबूट, रेनकोट, साबण इ. साधने दिली जात असल्याचे कागदोपत्री निदर्शनास आले आहे, परंतु प्रत्यक्षात कर्मचाऱ्यांना यातील काहीच मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कागदोपत्री दिसणारी साधनसामग्री प्रत्यक्षात मिळत नसल्यामुळे सदर व्यवहाराची चौकशी करुन सफाई कामगारांचे आरोग्य सुधारणेसाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१७) :(१) हे खरे नाही. तथापी मुंबई महापालिकेत गेल्या ५ वर्षात टी.बी., दमा. श्वासन विकाराने सुमारे १०६० सफाई कामगारांचा मृत्यू झाला आहे.

(२) सदर कामगारांना दरवर्षी सुरक्षित साधने दा. मास्क, हातमोजे, सेफटी शूज, गमबुट, रेनसुट, रिफलेक्टींग जॅकेट इ. वस्तू कामगारांना कामाच्या ठिकाणी पुरविण्यात आली आहे.

(३) सफाई कम्रचाऱ्यांकरीता त्यांच्या कुटूंबाची गुणवत्ता वाढविण्याकरीता त्यांना प्रमुख कामगार अधिकारी यांच्या खात्यामार्फत २ दिवसांचा प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबविला जातो. तसेच त्यांच्यासाठी निवासी प्रशिक्षण कार्यक्रम, नागरी प्रशिक्षण केंद्र, बोरीवली या ठिकाणी आयोजित केले जातात. त्याचप्रमाणे कामगारांची मोफत वैद्यकीय तपासणी करण्यात येते व विविध आजारपणासाठी लागणारा संपूर्ण वैद्यकीय खर्च महानगरपालिकेमार्फत महानगरपालिका रुग्णालयात करण्यात येतो.

सफाई कर्मचाऱ्यांकरीता आरोग्य गट विमा योजनेंतर्गत आरोग्य विमा पॉलिसी ही युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं. लि. मार्फत आरोग्य सेवा पुरविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जेएनपीटीच्या साडेबारा टक्के योजनेच्या भूखंडावरील भरावाचे काम बंद पाडल्याबाबत

(२५) ५३७५९ (२९-०८-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जेएनपीटीच्या (ता.उरण, जि.रायगड) साडेबारा टक्के योजनेच्या भूखंडावरील भरावाचे काम चालू झालेले असताना व प्रकल्पग्रस्तांना सहा महिन्यात ताबा देणार असताना जासई ग्रामस्थांनी विरोध दर्शवत दिनांक ८ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास काम बंद पाडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ग्रामस्थांच्या मागण्यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१७) :(१) हे खरे नाही. सदर भरावाचे काम सुरु आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

कुलाबा विभागात सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी उभारण्यात येणा-या ३०० कोटींच्या प्रकल्पाबाबत

(२६) ५३७७९ (२६-०८-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेतर्फे सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी कुलाबा विभागात उभारण्यात येणारा रुपये ३०० कोटींचा प्रकल्प काही तांत्रिक अडचणी दाखवून प्रलंबित ठेवल्याचे माहे मे, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या सांडपाणी पुर्नप्रक्रिया प्रकल्पासाठी महानगरपालिकेने सन २००३ मध्ये नेमलेल्या सल्लागार कंपनीने प्रकल्पाचे काम न करता फीच्या नावाखाली महानगरपालिकेकडून १५० कोटी रुपये घेतले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरच्या प्रकल्पाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सांडपाणी पुर्नप्रक्रिया प्रकल्पाच्या व्यवहारासंदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१७) :(१) हे खरे नाही.
(२) मुंबई मलनि:सारण प्रकल्प टप्पा-२ मधील प्राधान्य कामांमध्ये अंतर्भूत असलेली मुंबई शहरात ७ ठिकाणी मलजल प्रक्रिया केंद्राची दर्जोन्नती व तसेच इतर कामे यासाठी सन २००७ मध्ये ५ वर्षांच्या कालावधीसाठी मॉट मॅकडोनाल्ड - आर व्ही अँडरसन - मॉट मॅकडोनाल्ड इंडिया - पीएचई कन्सलंटन्ट कन्सोरटीयम या सल्लागारांची महानगरपालिकेमार्फत नियुक्ती करण्यात आली होती. तद्नंतर सदर कालावधी ३ वर्षांसाठी वाढवून देण्यात आला होता. सल्लागारांनी केलेल्या कामांच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत त्यांना रु. १४१.७७ कोटी रकमेचे अधिदान करण्यात आले आहे.
(३) व (४) महालेखापालांनी उपस्थित केलेल्या आक्षेपाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत लेखापरिक्षणामध्ये पैशांचा दुरुपयोग होत असल्याबाबत त्रिसदस्यीय समिती नेमण्यात आली आहे. या समितीचा अहवाल आल्यानंतर महापालिकेमार्फत पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे.

मलजल प्रक्रिया केंद्राची प्रस्तावित कामे टप्पयाटप्प्याने न करता शीघ्र गतीने होण्यासाठी महापालिकेमार्फत त्यांचे एकत्रीकरण करण्यात आले असून कमीत कमी जागेत बसण्यायोग्य तंत्रज्ञानाचा वापर करुन व प्रदुषण नियंत्रक मंडळाच्या मानकानुसार महापालिकेमार्फत प्रक्रिया केंद्र उभारण्याचे प्रस्ताविले आहे.

मुंबईतील जुन्या इमारतीचा पुनर्विकास करताना रस्त्यांच्या रुंदीकरणासाठी ४.५ मीटर जागा सोडणे विकासकांना बंधनकारक असल्याबाबत

(२७) ५४०७५ (२९-०८-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल मोटे (परांडा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जुन्या इमारतींचा पुनर्विकास करताना रस्त्यांच्या रुंदीकरणासाठी ४.५ मीटर जागा सोडणे बिल्डरांना बंधनकारक करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील लोअर परेल, शंकरराव नरामपथ येथील श्रीनिवास या जुन्या इमारतीचा पुनर्विकास करताना विकासकाने याबाबत कोणत्याच नियमावलीचे पालन केलेले नाही असे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याबाबत शासनाने संबंधित विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०२-२०१७) :(१) अशी बाब नाही.

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ अंतर्गत प्रस्तावित केलेल्या रस्त्याच्या रेषेने एखाद्या भूखंडामधील क्षेत्र बाधित होत असेल तर असे क्षेत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरण करणे आवश्यक आहे.

(२) श्रीनिवास मिल येथील चाळींच्या पुनर्विकासासाठीच्या इमारतीसमोरील शंकरराव नराम मार्ग १३.४० मी. रस्त्यांच्या रेषेने बाधित होत आहे. त्याप्रमाणे रस्त्याच्या रेषेने बाधित होणारे क्षेत्र सोडले असून नियमानुसार ४.५ मीटर मोकळी जागा सोडली आहे. सदर इमारतीस मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. तसेच भोगवटा प्रमाणपत्रही देण्यात आलेले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण महानगरपालिकेच्या स्वच्छतागृहाचा निधीचा विकासकाने अपहार केल्याबाबत

(२८) ५४३७२ (२९-०८-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण महानगरपालिका प्रशासनाने जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियानातून नागरिकांना सार्वजनिक व खाजगी शौचालये बांधण्यासाठी प्रोत्साहन देऊन प्रत्येक खाजगी शौचालयासाठी पहिल्या टप्प्यात १४ हजार व दुसऱ्या टप्प्यात १४ हजार असा एकूण २८ हजार रुपयांचा निधी मंजूर केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंजूर झालेल्या निधीचा एम.जे.एंटरप्रायजेस या विकासकाने अपहार केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या भागातील महिलांनी याबाबतची तक्रार बाजारपेठ पोलीस स्टेशनला करुनही त्याची दखल घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित विकासक व महानगरपालिका अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०२-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत वैयक्तिक घरगुती शौचालय बांधकामासाठी प्रती लाभार्थी एकूण रुपये २८,०००/- एवढे अनुदान देण्यात येते. लाभार्थ्यांने शौचालयाचे अर्धे बांधकाम केल्यानंतर पहिल्या हप्त्याची रक्कम रुपये १४,०००/- लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते व बांधकाम पूर्ण झाल्यानंतर दुसऱ्या हप्त्याची रक्कम रुपये १४,०००/- संबंधित लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येते.
(२) व (३) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत वैयक्तिक घरगुती शौचालयाचे बांधकाम संबंधित लाभार्थ्यांने करावयाचे आहे. लाभार्थ्यांस वैयक्तिक घरगुती शौचालयाचे बांधकाम करण्यास अडचण येत असल्यास प्रिफॅब्रिकेटेड शौचालयाचा पर्याय उपलब्ध करुन देण्यास्तव एम.जे इंटरप्रायजेस या उत्पादकाच्या प्रिफॅब्रिकेटेड शौचालयाचा नमुना महानगरपालिका आवारात नागरिकांच्या माहितीसाठी ठेवण्यात आला होता. लाभार्थ्यांने असे प्रिफॅब्रिकेटेड शौचालय बसविण्याचा निर्णय घेतल्यास याबाबतचा आर्थिक व्यवहार संबंधित लाभार्थी व संबंधित उत्पादक यांच्यात होतो. यामध्ये कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचा कोणताही सहभाग नाही. त्यामुळे एम.जे इंटरप्रायजेस यांनी महानगरपालिकेच्या निधीचा अपहार करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, काही लाभार्थ्यांनी मे.एम. जे. इंटरप्रायजेस यांना परस्पर शौचालयाची बांधकामे दिली होती. त्यापैकी काही लाभार्थ्यांनी बाजारपेठ पोलीस ठाणे, कल्याण येथे मे. एम.जे. इंटरप्रायजेस यांच्या विरुध्द दिनांक १७/०२/२०१६ आणि २८/५/२०१६ रोजी तक्रार अर्ज दाखल केली होती. सदर अर्ज पोलीस प्रशासनाने चौकशी करुन अनुक्रमे १९/०३/२०१६ आणि ११/०६/२०१६ रोजी निकाली काढले आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई येथील इंदू मिलच्या जागेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे भूमीपूजन होऊनही जागा शासनाच्या नावे न झाल्याबाबत

(२९) ५४५१२ (२६-०८-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव),

श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जीवा गावित (कळवण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे मा.पंतप्रधान नरेंद्र मोदीच्या हस्ते माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास इंदू मिलच्या जागेत भूमिपूजन करण्यात आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या १२५ व्या जयंती निमित्त दिनांक १४ एप्रिल, २०१६ रोजीच स्मारकांच्या कामास सुरूवात होईल अशी अपेक्षा असताना प्रत्यक्षात अद्याप सदर जमीन शासनाच्या ताब्यात मिळालेली नसल्याने स्मारकांचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इंदू मिलची जमिन आजमितीस शासनाकडे हस्तांतरण न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, जमिन ताब्यात घेऊन स्मारकांच्या कामास तात्काळ सुरुवात होण्याच्या दृष्टीने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०२-२०१७) :(१) होय.

(२) सदर जागेवर काम करण्याची परवानगी आहे. मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडून सदर जागेवरील जुनी बांधकामे पाडून टाकण्यात येत आहेत.

(३) व (४) इंदू मिलची जागा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रस्तावित स्मारकासाठी राज्य शासनास हस्तांतरण करणेस केंद्र शासनाने मंजूरी दिलेली आहे. याबाबत मा.वस्त्रमंत्री, भारत सरकार यांनी दिनांक ५.९.२०१६ रोजीचे पत्रान्वये राज्य शासनास कळविलेले आहे. त्याप्रमाणे सदरची जागा ताब्यात देणे व घेणेची अनुषंगाने राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळ व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास दिनांक २१.११.२०१६ रोजीचे पत्रान्वये राज्य शासनाकडून सूचना देणेत आलेल्या आहेत.

सर्व संबंधित व्यकती आणि संस्था यांचेशी चर्चा करुन प्रस्तावित स्मारकाचा आराखडा अंतिम करण्यासाठी मा.मंत्री (सामाजिक न्याय) यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त करणेत आलेल्या एक सदस्यीय समितीने प्रस्तावित स्मारकाचे संकल्पना आराखडे अंतिम केलेले आहेत. त्यानुषंगाने आता पुढील कार्यवाही संकल्पित आहे.

कल्याण-अंबरनाथ महामार्ग रुंदीकरण व पुनर्वसनाबाबत

(३०) ५४५२९ (२६-०८-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि. ठाणे) महानगरपालिका आयुक्तांनी कल्याण-अंबरनाथ रस्त्याचे १०० फुट रुंदीकरणाचे काम पोलीस बंदोबस्तात १५ दिवसात पूर्ण केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे रुंदीकरण करताना सुमारे ८०० दुकाने अंशतः बाधित झाली असून २५५ दुकाने संपूर्ण बाधित झाल्याने या बाधित दुकानदारांना बांधकामाचे परवाने देताना फार मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१७) :(१) होय.
(२) हे खरे नाही.

कल्याण-अंबरनाथ १०० फुटी रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत झालेल्या बांधकामधारकांना निष्कासित झालेल्या बांधकामाचे मोजमाप करुन पंचनामा देण्यात आलेले आहे. त्यात कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

गोदावरी नदीच्या पूररेषेवरील बांधकामावर निर्बंध घालण्याबाबत

(३१) ५४७४५ (१९-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील, गोदावरी नदीच्या पूररेषेवरील बांधकामावर निर्बंध घालण्याची शिफारस 'नीरी', या संस्थेने केली असतांनाही, शासनाच्या उप विभागीय आयुक्तांच्या समितीने याकडे दुर्लक्ष केल्यामुळे, विभागीय आयुक्तांनी,केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २१ एप्रिल, २०१६ रोजी दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नदीचा प्रवाह सुरक्षित होण्याच्या दृष्टीने ब्लु लाईन बरोबर लेड लाईन लगतच्या बांधकामांना बंदी घालण्यात यावी याबाबत नीरी संस्थेने केलेल्या शिफारषीची अद्याप शासनाने अंमलबजावणी केली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून व त्या अनुषंगाने गोदावरी नदीच्या, पूररेशेवरील बांधकामावर निर्बंध घालण्याच्या दृष्टीने, शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंब व दुर्लक्षाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१७) :(१) होय.
(२), (३), (४) व (५) नीरी संस्थेने केलेल्या शिफारशी लक्षात घेवून नाशिक शहरासाठी दि.०९.०१.२०१७ रोजी प्रारुप विकास योजना मंजूर करताना उचित त्या तरतुदी अंतर्भूत करण्यात आलेल्या आहेत.

मुंबईतील भेंडी बाजाराच्या पुनर्विकासाबाबत

(३२) ५५३१४ (२९-०८-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भेंडी बाजाराच्या समूह पुनर्विकासाचे (क्लस्टर डेव्हलपमेंट) काम सैफी बुरहानी ट्रस्टने हाती घेतल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पास शासनाने मान्यता दिली आहे काय,

(३) असल्यास, भेंडीबाजार येथील इमारतीमध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांच्या पुनर्वसनासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१७) :(१) सैफी बुऱ्हाणी अपलिफ्टमेंट ट्रस्टमार्फत भेंडीबाजार मुंबई येथे राबण्यात येत असल्याचे विकास नियंत्रण नियमावली ३३(९) अन्वयेच्या समुह पुनर्विकास प्रकल्पास शासनाने दि. २२/७/२०११ रोजी तत्वत: मान्यता दिलेली आहे.

त्याअनुषंगाने सदर प्रस्तावास बृहन्मुंबई महानगरपालिकेने दि. ११/०८/२०११ रोजी इरादापत्र देण्यात आले असून सदर इरादापत्राची विधीग्राहयता दि.९/८/२०१७ पर्यंत वाढविण्यात आली आहे. सदर पुनर्विकास प्रकल्पाचा अभिन्यास आराखडा (layout) महापालिकेकडून दि. २१/६/२०१६ रोजी मंजूर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावामधील नियोजित ९ सेक्टर्सपैकी सेक्टर-३ व सेक्टर १ वरील प्रस्तावित इमारतीकरीता अनुक्रमे दि. २३/०१/२०१५ व दि. ३०/४/२०१५ रोजी अमान्यतेची सूचना (आय.ओ.डी.) व अनुक्रमे दि. २६.६.२०१५ व दि. २८/८/२०१५ रोजी जोत्यापर्यंतच्या बांधकामाचे प्रमाणपत्र (प्लीन्थ सी.सी) महापालिकेने दिले आहे.

(३) व (४) सदर सामुहिक विकास प्रकल्पामधील मूळ निवासी गाळेधारकांना मे.एस.बी.यु.टी. मार्फत ई-विभागातील अंजीरवाडी येथे ९५० व अनिवासी गोळधारकांना बी-विभागातील मुफद्दल शॉपिंग, मांडवी, नूरबाग येथे २०० गाळ्यांचे संक्रमण शिबिर बांधण्यात आले आहेत. तसेच न्यु हिंद मिल व चुनाभट्टी येथील म्हाडाच्या संक्रमण शिबिरात अनुक्रमे १०७४ व ४५४ गाळेधारकांना स्थलांतरीत करण्याचे प्रस्ताविले आहे. प्रस्तावित सेक्टर-१ च्या लगत, ६२ अनिवासी गाळेधारकांसाठी संक्रमण शिबिर सक्षम अधिकारी यांचे मान्यतेनंतर मंजूर करण्यात आले आहे.

प्रकल्पातील, मूळ रहिवाशांना सदर संक्रमण शिबिरामध्ये प्रकल्पाच्या व्याप्तीनुसार टप्या-टप्प्याने स्थलांतरीत करण्याचे प्रस्तावित आहे.

कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील माजी सैनिकांना मालमत्ता करात सूट देण्याबाबत

(३३) ५५९०९ (२६-०८-२०१६). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील माजी सैनिकांना मालमत्ता करात १०० टक्के सूट द्यावी, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी केली असता त्यास दिनांक २२ मार्च, २०१० रोजीच्या महापालिकेच्या महासभेने मंजूरी दिली असल्याचे माहे एप्रिल, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१७) :(१) होय.

(२) संरक्षण दलातील शौर्य पदकधारक आणि माजी सैनिकांच्या विधवांना नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात त्यांच्या नावावर असलेल्या मालमत्तेच्या मालमत्ता करातून सूट देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

तसेच संरक्षण दलातील शहीद झालेल्या अविवाहित सैनिकांच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रातील नामनिर्देशित मालमत्तांना मालमत्ता करातून सूट देण्याचा निर्णय देखील राज्य शासनाने घेतला आहे.

उपरोक्तनुसार अशी मागणी प्राप्त झाल्यास संबंधितांना मालमत्ता करातून सूट देण्यात येत असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई छत्रपती शिवाजी टर्मिनस व चर्चगेट या दोन रेल्वेस्थानकांना जोडण्याबाबत

(३४) ५६४७६ (२६-०८-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई छत्रपती शिवाजी टर्मिनस ते चर्चगेट या दोन रेल्वेस्थानकांना एकमेकांशी जोडण्यासाठी केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने अंडरग्राऊंड टनेल बनविण्याच्या घेतलेल्या निर्णयानुसार प्रस्ताव शासनास पाठविला आहे काय,

(२) असल्यास, सदर अंडरग्राउंड टनेल प्रस्तावाचे स्वरुप काय आहे व किती कालावधीत सदर अंडरग्राउंड टनेलच काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे तसेच या कामासाठी केंद्र शासन व राज्य शासन यांचा किती टक्के निधीचा सहभाग आहे,

(३) अद्याप या प्रकरणी अंमलबजावणीस सुरुवात झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१७) :(१), (२) व (३) नाही. तथापि, मुंबई छत्रपती शिवाजी टर्मिनस व चर्चगट या दोन रेल्वे स्थानकांना मुंबई मेट्रो लाईन - ३ या भुयारी मेट्रो रेल्वेद्वारे प्रवाशांना जोडणी उपलब्ध होणार आहे.

मुंबईतील वांद्रे कुर्ला कॉम्पलेक्समधील (बीकेसी) सायकल ट्रॅक व बस मार्गिकेबाबत

(३५) ५७७८९ (२९-०८-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)मुंबईतील वांद्रे कुर्ला कॉम्पलेक्समध्ये (बीकेसी) सायकल ट्रॅकसाठी साडेसहा कोटी रुपयांचा निधी व्यर्थ गेल्यानंतर आता बसकरीता नव्याने तयार करण्यात आलेल्या स्वतंत्र मार्गिकेसाठी एमएमआरडीएला १.२४ कोटी रुपये खर्च आला असून या मार्गिकेची देखभाल होत नसल्याची बाब एप्रिल, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सायकल ट्रॅकचा वापर सध्या वाहने पार्किंगसाठी केला जात असून बस मार्गिकेवरुन अद्यापही बेस्ट बसचा प्रवास होताना दिसत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मार्गिकेची देखभाल न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या बस मार्गिकेचा वापर सुरु करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१७) :(१), (२), (३), (४) व (५) सदर मार्गिकेवरुन बेस्ट बसेसचा प्रवास दिनांक ११ मे, २०१६ पासून पूर्णपणे करण्यात येत आहे.

बांद्रा-कुर्ला संकुलमध्ये kerb side Bus Lane ही प्रथम ३ महिन्याच्या कालावधीकरिता प्रयोगिक तत्वावर राबविण्यात आली. सदर बस मार्गिकेमुळे, बसचा सरारसी वेग वाढला असून, प्रवासातील सरासरी वेळ हा ३३ मिनिटांवरुन १५ मिनिटे झाला आहे.

मुंबईतील नरिमन पॉइंट ते कांदिवली दरम्यानच्या सागरी मार्गाबाबत

(३६) ५८७४७ (२९-०८-२०१६). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नरिमन पॉइंट ते कांदिवली दरम्यानच्या सागरी मार्गामध्ये मलबार हिल आणि जुहू चौपाटी या दोन ठिकाणी बोगद्यांचा समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्पासाठी एकूण किती खर्च अपेक्षित आहे, तसेच सदर प्रकल्पाचे काम केव्हा सुरु करण्यात येणार आहे,

(३) तसेच या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०२-२०१७) :(१) होय.
(२) व (३) सदर प्रकल्पासाठी अंदाजे १२००० कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर प्रकल्पासाठी केंद्रीय पर्यावरण व वनमंत्रालय यांची परवानगी मिळावयाची आहे. त्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून पाठपुरावा करणेत येत आहे. सदर मान्यता मिळाल्यानंतर निविदा प्रक्रियेबाबत कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून अनुसरणेत येईल.

मुंबईतील के.ई.एम रुग्णालयाची रोटो सेंटर म्हणून निवड झाल्याबाबत

(३७) ५८८६९ (२६-०८-२०१६). श्री.सदा सरवणकर (माहिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रीय आरोग्य विभागाने मुंबईतील के.ई.एम. रुग्णालयाची रिझनल ऑरगॅन व टिशू ट्रांसप्लांटेशन ऑर्गनायझेशन म्हणून निवड केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास येथे रोटो सेंटरची निवड होऊन मोठा कालावधी लोटला असताना अद्यापही रोटो सेंटर सुरू करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रोटो सेंटरसाठी केंद्र शासनाने आर्थिक मदत देण्याचा प्रस्ताव मान्य करूनही अद्याप दिली नसुन केंद्रिय आरोग्य विभागाने मंजूर केलेले अर्थसहाय्य तातडीने मिळावे म्हणून राज्य शासन व के.ई.एम. रुग्णालय सातत्याने पाठपूरावा करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर के.ई.एम. रोटो सेंटर मध्ये गरीब रुग्णांना ह्रदय प्रत्यारोपणाची शस्त्रक्रीया माफक दरात केली जाणार असून अवयव दानाची जनजागृती करण्याचे प्रमुख केंद्र बनण्याचा प्रचार शासन करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, के.ई.एम. रुग्णालयातील रोटो सेंटर सुरु करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०१७) :(१) व (२) हे खरे आहे.
(३) आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांनी उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले नसल्याने निधी उपलब्ध होऊ शकला नाही. तथापि, याबाबत पाठपुरावा सुरु आहे.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) के.ई.एम रुग्णालयातील रोटो सेंटर सुरु करण्याबाबत महानगरपालकेमार्फत कार्यवाही सुरु आहे.

कन्हान पिंपरी नगरपरिषद (जि.नागपूर) करिता वाढीव पाणी पुरवठा करण्याबाबत

(३८) ५९१३४ (२६-०८-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्हान पिंपरी नगरपरिषद (जि.नागपूर) करिता वाढीव पाणी पुरवठयाच्या प्रकल्प अहवालास सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत मंजुरी देवून निधी उपलब्ध करुन देण्याचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जुलै, २०१५ रोजी वा त्या सुमारास शासनास दिले होते, हे खरे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१७) :(१) महाराष्ट्र सुपर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत कन्हान पिंपरी नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा प्रकल्पास मान्यता देणेबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे मार्च, २०१६ चे निवेदन शासनास प्राप्त झालेले आहे.

(२) व (३) कन्हान - पिंपरी नगरपरिषदेचा पाणीपुरवठा प्रकल्प प्रस्ताव नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडे प्राप्त झालेला असून सदर प्रस्तावाची तांत्रिक छाननी करण्यासाठी प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठविण्यात आला आहे.

जयश्रीसिंह चाळ, राममंदिर रोड, घासबाजार (वालभट्ट रोड), गोरेगाव (पूर्व) येथील रहिवाशांना मे. राईट चॅनेल कन्स्ट्रक्शन प्रा.लि.या विकासकाकडून फसवणूक करण्यात आल्याबाबत

(३९) ५९४९० (२९-०८-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.प्रदीप नाईक (किनवट) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जयश्रीसिंह चाळ, राममंदिर रोड, घासबाजार (वालभट्ट रोड), गोरेगाव (पूर्व) येथील रहिवाशांना मे. राईट चॅनेल कन्स्ट्रक्शन प्रा.लि. या विकासकाने अप्पर तहसिलदार, बिनशेती बोरीवली १, उप जिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन) मालाड, एसआरए च्या अधिकाऱ्यांशी संगनमत करुन फसवणूक केल्याचे तसेच अंधेरी (पूर्व), मालाड (पश्चिम), बोरीवली (पूर्व) येथील चाळधारकांनाही उक्त विकासकाने फसविले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत जयश्रीसिंह चाळ येथील रहिवाशांनी मा.पंतप्रधान, मुख्यमंत्री, प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, महापौर, मुंबई यांना माहे फेब्रुवारी, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात लेखी निवेदन दिले असता तेथील रहिवाशांना मे. राईट चॅनेल कन्स्ट्रक्शन प्रा.लि. या विकासकाने धमकावले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनानुसार मे. राईट चॅनेल कन्स्ट्रक्शन प्रा.लि. या विकासकावर तसेच संबंधित अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (१८-०२-२०१७) :(१) व (२) हे खरे नाही.

जयश्रीसिंह चाळ, राममंदिर रोड, घासबाजार (वालभट्ट रोड),गोरेगांव (पूर्व) येथील जय बजरंग एस.आर.ए. गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अनुषंगाने श्री.रमेश सा.साबळे यांनी मुख्य प्रवर्तक, जय बजरंग एस.आर.ए. गृहनिर्माण संस्था या नावाने दिलेले दि. १९/२/२०१६ रोजीचे निवेदन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे उचित कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहे. मात्र सदर संस्थेचे "मुख्य प्रवर्तक" श्री.रमेश सा.साबळे नसल्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने कळविले आहे.

सदरहू योजनेच्या विकासकाविरुध्द रहिवाश्यांकडून अंधेरी पोलीस ठाण्याच्या उपलब्ध अभिलेखानुसार कोणताही गुन्हा नोंदविण्यात आला नसल्याचा पोलीस विभागाचा अहवाल आहे.

(३) सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण विकासक मे.राईट चॅनेल कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना पुनर्वसन घटक इमारतीचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करुन पात्र झोपडीधारकांना घराचा ताबा देण्याच्या सुचना दिल्या आहेत. जय बजरंग सहकारी गृहनिर्माण संस्थेचे मुख्य प्रवर्तक श्री.अफसरसिंग सुरजबली सिंग यांन सदर संस्थेची कोणतीही तक्रार नसल्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

उदगीर (जि.लातूर) येथे कायमस्वरुपी पाणी पुरवठा करण्याबाबत

(४०) ५९७८५ (२६-०८-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) येथे कायमस्वरुपी पाणी पुरवठा करणेसाठी अटल अमृत योजनेअंतर्गत १२६ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील योजनेअंतर्गत उदगीर शहरास कायमस्वरुपी पाणी पुरवठा करण्यात यावा यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वतीने शासनाकडे पाणी पुरवठा आरक्षण प्रस्ताव माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यासुमारास दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने वरील पाणी आरक्षण प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०२-२०१७) :(१) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत उदगीर शहराच्या रु. १०६ कोटी किंमतीच्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिलेली आहे.

(२), (३) व (४) उदगीर शहरास उर्ध्व मानार (लिंबोटी) प्रकल्पातून कायमस्वरुपी पाणीपुरवठा करण्याच्या अनुषंगाने ६.९७ दशलक्षघन मीटर पाणी आरक्षण प्रस्तावास शासनाने दि. ०९ ऑगस्ट, २०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे.

सेलु नगरपालिकेने शौचालयाचे अनुदान लाभार्थ्यांना न दिल्याबाबत

(४१) ५९९२५ (२९-०८-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुभाष साबणे (देगलूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.अमित घोडा (पालघर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वच्छ भारत अभियांनांतर्गत सेलू (जि.परभणी) शहरातील सुमारे ३२५० लाभार्थ्यांनी शौचालये बांधकाम करण्यासाठी नगरपालिकेकडे अर्ज दाखल केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लाभार्थ्यांपैकी ११०० लाभार्थ्यांना पहिला हप्ता रुपये ६०००/- आणि केवळ ३१ लाभार्थ्यांना दुसरा हप्ता रु.४०००/- देण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शौचालय बांधकामाचे अनुदान लाभार्थ्यांना न दिल्यामुळे अनेक लाभार्थ्यांनी स्वत:च्या खर्चाने बांधकाम पुर्ण केले असल्याची बाब माहे मे, २०१६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करून संबंधित लाभार्थ्यांना तातडीने अनुदान वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१७) :(१) हे अंशत: खरे आहे.

स्वच्छ भारत अभियानातंर्गत वैयक्तिक घरगुती शौचालय बांधकामाच्या अनुदानासाठी सेलू नगरपरिषदेकडे एकूण ३४६० अर्ज प्राप्त झाले आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

सेलू नगरपरिषदेमार्फत वैयक्तिक घरगुती शौचालय बांधकामाकरीता पात्र लाभार्थ्यांपैकी १७१० लाभार्थ्यांना रु.६०००/- प्रमाणे पहिला हप्ता व ८३ लाभार्थ्यांना रु.६०००/- प्रमाणे दुसरा हप्ता वितरीत करण्यात आला आहे.

(३) स्वच्छ भारत अभियानांतर्गत वैयक्तिक घरगुती शौचालय बांधकामासाठी पात्र लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर केल्यानंतर पहिल्या हप्त्याचा निधी वितरीत करण्यात येतो. शौचालयाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर, अर्जदार व शौचालयाचे बांधकाम यांचा भौगोलिक टॅग केलेला फोटो स्वच्छ भारत अभियानाच्या एम.आय.एस व अपलोड केल्यानंतर दुसऱ्या हप्त्याचा निधी वितरीत करण्यात येतो. त्यानुसार शौचालयाचे बांधकाम पूर्ण केलेल्या लाभार्थ्यास सेलू नगरपरिषदेमार्फत दुसऱ्या हप्त्याचा निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

खामगाव येथील नगरपरिषदेंतर्गत (UIDSSMT) पाणी पुरवठा योजनेचे कामात झालेला गैरव्यवहार

(४२) ६०१०९ (२९-०८-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि.बुलढाणा) येथील नगरपरिषदे अंतर्गत (UIDSSMT) पाणी पुरवठा योजनेचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याने याबाबत संपूर्ण योजनेची उच्च स्तरीय चौकशी करणेबाबत दिलेल्या निवेदनावर सदर योजनेची संचालक, नगरपरिषद प्रशासन यांचेमार्फत चौकशी करण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीचा अहवाल शासनास सादर झालेला असून चौकशी अहवालाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) तसेच खामगाव (जि.बुलढाणा) येथील नगरपरिषदे अंतर्गत (UIDSSMT) पाणी पुरवठा योजनेचे काम प्रलंबित असल्यामुळे ते महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यात येणार होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हस्तांतरणाची कारवाई पूर्ण करून सदर योजनेचे काम तात्काळ सुरु करण्यात येणार आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) * खामगांव, जि.बुलढाणा येथील नगरपरिषदे अंतर्गत असलेल्या पाणी पुरवठा योजनेच्या प्रकल्पाचे काम उपरोक्त कालमर्यादेत पूर्ण होण्यासाठी उर्वरित कामकाजाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

- तसेच मंजूर केलेल्या पाणीपुरवठा योजनेतील निविदा प्रक्रिया व त्यासंदर्भात यापूर्वी लेखापरिक्षणात उपस्थित आक्षेप याबाबत विशेष लेखापरीक्षण संचालक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई यांचेकडून करुन घेतले असून त्याअनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या वरिष्ठ अभियंत्यांना डावलून आपल्या नातेवाईकाला नगररचना विभागाचे सहायक नगर रचनाकार या पदाचा अतिरिक्त पदभार दिल्याबाबत

(४३) ६०२३७ (२९-०८-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या (जि.ठाणे) वरिष्ठ अभियंत्यांना डावलून आपल्या नातेवाईकाला नगररचना विभागाचे सहायक नगर रचनाकार या पदाचा अतिरिक्त पदभार दिल्याबाबतची तक्रार नगरविकास विभागाचे सचिव यांच्याकडे माहे मे, २०१६ मध्ये व त्या सुमारास माजी आमदार व म्हाडाचे माजी अध्यक्ष यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१७) :(१) अशा आशयाचे निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण-डोंबिवली महापालिकेने कै. प्रकाश परांजपे स्पर्धा परीक्षा केंद्राची उभारणी केल्याबाबत

(४४) ६०९४२ (२९-०८-२०१६). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महापालिकेने ५ वर्षापूर्वी कल्याणच्या मध्यवर्ती भागात सुमारे १ कोटी रुपये खर्च करुन कै. प्रकाश परांजपे स्पर्धा परीक्षा केंद्राची उभारणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महापालिका प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे सदर स्पर्धा परीक्षा केंद्र बंद पडले आहे, त्यामुळे शहरातील विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर स्पर्धा परीक्षा केंद्र तातडीने सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१७) :(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कै.प्रकाश परांजपे स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण केंद्राच्या उभारणीसाठी महानगरपालिकेकडून रु.८५ लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे.
(२) सदर प्रशिक्षण केंद्र चालविण्यासाठी महानगरपालिकेडून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांना भाडेतत्वावर देण्यात आले होते. मात्र प्रशिक्षणाचा हेतू साध्य होत नसल्याचे महानगरपालिकेच्या निदर्शनास आल्याने माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये सदर संस्थेकडून जागा ताब्यात घेण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याची बाब खरी असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(३) सदर स्पर्धा परिक्षा केंद्र पुन्हा सुरु करण्याच्या दृष्टीने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून स्वारस्याच्या अभिव्यक्तीची सूचना प्रसिध्द करण्यात आली असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरात २२ पाळणाघरे उभारण्याची योजना कागदावरच राहिल्याबाबत

(४५) ६१३५९ (२४-०८-२०१६). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात २२ पाळणाघरे उभारण्याची योजना कागदावरच राहिल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच, नागरीवस्ती विभागाने प्रस्ताव तयार करून महिला व बालकल्याण समितीपुढे मांडणे आवश्यक होते, मात्र योग्य रीतीने पाठपुरावा न केल्याने ही योजना रखडली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.

पुणे महानगरपालिकेमार्फत शिवाजीनगर गावठाण, पुणे येथे पाळणाघर उपक्रम सुरु आहे. पुणे शहरामध्ये अन्य ठिकाणी सदर उपक्रम सुरु करणे करीता स्वारस्य अभिव्यक्ती सूचना मागविणे करीता जाहिरात प्रसिध्द करणेत आली आहे.
(२) व (३) हे खरे नाही. पुणे महानगरपालिका, समाज विकास विभाग मार्फत पुणे शहरात अन्य ठिकाणी पाळणाघर उपक्रम सुरु करणे करीता महानगरपालिका स्तरावर कार्यवाही सुरु आहे. याबाबत महिला बाल कल्याण समिती, पुणे महानगरपालिकेची मान्यता प्रलंबीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

अमरावती शहरातील वाढीव पाणी पुरवठयाची कामे सुरु करणेबाबत

(४६) ६२४७२ (२९-०८-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजने अंतर्गत अमरावती शहरातील वाढीव पाणी पुरवठयाची कामे मंजुर करण्यात आली असून या करीता केंद्र शासन व राज्य शासनाचा प्रथम हप्त्याचा निधी देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती महानगरपालिकेच्या नागरी क्षेत्रात होणारी वाढ व नागरीकांची पाण्याची आवश्यकता लक्षात घेता या योजनेच्या प्रत्यक्ष कामाला सुरवात करण्यात आली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१७) :(१) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत अमरावती शहराच्या रु.११४.३५ कोटी किंमतीच्या पाणी पुरवठा प्रकल्पास शासनाने मान्यता दिलेली असुन सदर प्रकल्पासाठी केंद्र व राज्य शासनाचा पहिल्या हप्त्याचा निधी रु.१४.४७ कोटी वितरीत करण्यात आला आहे.
(२) व (३) सदर प्रकल्पाचे कार्यादेश ऑक्टोबर, २०१६ मध्ये देण्यात आले असू प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या सांडपाणी पुनप्रक्रिया प्रकल्पांबाबत

(४७) ६२६३८ (२६-०८-२०१६). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या आठ सांडपाणी पुनप्रक्रिया प्रकल्पांचा खर्च राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील सांडपाणी प्रकल्पांच्या तुलनेत प्रचंड महागडा असल्याची बाब माहे मे, २०१६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंतरराष्ट्रीय प्रकल्पांची माहिती न घेता महागड्या दराने कंत्राटदारांना फायदा पोहचविण्याकरिता या प्रकल्पाच्या निविदा काढण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुनप्रक्रिया केलेल्या पाण्याचा कोणता वापर करणार आहे याबाबत निश्चित योजना महापालिकेकडे नसल्याने सध्यातरी हे पाणी ३ कि.मी. आत समुद्रात सोडण्याचे निश्चित करण्यात आल्याने सागरी पर्यावरणाचा प्रश्न निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१७) :(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही. मलजल प्रक्रिया केंद्राचे प्रस्तावित कामे कमीत कमी जागेत बसण्यायोग्य तंत्रज्ञानाचा वापर करुन व प्रदुषण नियंत्रक मंडळाच्या मानकांनुसार प्रस्तावित आहे. प्रदुषण मंडळाच्या वेळोवेळी प्राप्त मानकांनुसार कामे करण्याचे प्रस्ताविले असून त्यामध्ये व्दितीय स्तरावरील प्रक्रिया टप्प्याटप्याने करुन पुनर्प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचे वापर पिण्याच्या पाण्या व्यतिरिक्त व औद्योगिक वापरासाठी करण्याचे प्रयोजन आहे. पुनर्प्रक्रिया केलेल्या पाण्यांच्या वापराकरीता बृहत आराखडा बनविण्यासाठी सल्लागारांची नेमणूक करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

अंधेरी (मुंबई) येथील मेडीकल दुकानाला लागलेल्या आगीत ९ लोकांचा मृत्यू झाल्याबाबत

(४८) ६४२२८ (२९-०८-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (मुंबई) येथील मेडीकल दुकानाला दिनांक ३० जून, २०१६ रोजी पहाटेच्या सुमारास आग लागल्याने यात एकाच परिवारातील ९ लोकांचा घटनास्थळी मृत्यू झाला असल्याची दुर्देवी घटना घडल्याचे दिनांक ५ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारचे अपघात रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१७) :(१) दिनांक ३० जून, २०१६ रोजी निजाम मिस्त्री चाळ, वायरलेस रोड, जुहू गल्ली, अंधेरी (पश्चिम), मुंबई येथे ही दुर्देवी घटना घडली, हे खरे आहे.

सदर आगीमध्ये मृत्य पावलेल्यामध्ये ३ पुरुष व ६ महिलांचा समावेश होता.

(२) सदर दुर्घटनाग्रस्त मेडीकलचे दुकान हे "गलीच्छ वस्ती" म्हणून घोषित असलेल्या भूखंडावर स्थित आहे. अशा प्रकारच्या अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्याबाबत महानगरपालिकेने उपजिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन) यांना दिनांक २७.९.२०१६ रोजी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील तबेल्यांचे स्थलांतरण करण्याबाबत

(४९) ६५००१ (१०-११-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत तब्बल १७०० गोठे-तबेले असून त्यातून लगतची गटारे, नाले व नद्यामध्ये गाई-म्हशींचे मलमूत्र आणि अन्य कचरा टाकण्यात येतो, असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईच्या उपनगरातील तबेल्यातून नाल्यात शेण पाणी टाकले जाते. शेणपाण्याची विल्हेवाट लावणे व स्वच्छता राखणेबाबत महापालिकेने मुंबईतील तबेल्यांच्या मालकांना नोटीसा दिल्या परंतु त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे दिनांक ४ जून, २०१६ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत उपाययोजना म्हणुन मुंबईतील सर्व तबेले वसईजवळ हलविण्याचे आदेश शासनाने यापूर्वी दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबईतील तबेले मुंबईच्या बाहेर इतरत्र स्थलांतरीत करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१७) :(१) हे खरे नाही.

सदर तबेल्यातील गाई-म्हशींचे मलमुत्र खत निर्मितीसाठी पाठविण्यात येते. शिल्लक कचरा वेळोवेळी महानगरपालिकेमार्फत संकलीत करण्यात येते.

(२) गाई-म्हशींचे मलमुत्र नदी- नाल्यामध्ये सोडण्यात आल्याचे आढळल्यास संबंधित तबेला धारक विरुध्द मुंबई महानगरपालिका अधिनियमाती कलम ३९४ (१), ३८१, ४१२ (अ), २७९, ६९८ व भारतीय दंड संहिता २६९, २७० अन्वये कार्यवाही करण्यात येते.

(३) व (४) मुंबईतील तबेले बृहन्मुंबईच्या बाहेर हलविण्याबाबत जनहित मंच या अशासकीय संस्थेने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केली आहे. मा.उच्च न्यायालयाने अंतरीत आदेशान्वये मुंबईतील सर्व तबेले दापचेरी येथे हलविण्याबाबत अंतरीम आदेश दिले असून, याचिका अंतिम आदेशाकरीता न्यायप्रविष्ठ आहे.

मुंबईतील रस्ते निर्माण करण्याबाबत

(५०) ६५०३० (१०-११-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत रस्ते बनविताना नवीन निकष ठरविण्यात आले आहेत व याला स्टँडिंग टेक्निकल ॲथोरीटी कमिटीने (एसटीएसी) मंजुरी दिली आहे, परंतु मुंबई महापालिकेने जुन्या निकषाप्रमाणे रस्त्याच्या निविदा काढल्या असल्याचे दिनांक २ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन निकषाप्रमाणे रस्ते बनविल्यास २० ते २२ टक्के रकमेची बचत होते. उदा.जुन्या निकषाप्रमाणे एका रस्त्यासाठी १०० कोटी रुपये खर्च येणार असेल तर हाच खर्च नवीन निकषाप्रमाणे ७५ ते ८० कोटी रुपयापर्यंत येणार असल्याने महापालिकेने कोट्यवधी रुपयांची बचत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१७) :(१) हे खरे नाही. मुंबई महानगरपालित रस्ते विभागातील विविध तांत्रीक समस्यांचे निराकरण करण्यासाठी सन २००४ पासून स्थायी तांत्रीक सल्लागार समितीची (STAC) स्थापना केली असून त्यात तज्ञ व्यकतींची नेमणूक करण्यात आली आहे. सदर समितीने वेळोवेळी निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणेच मुंबई महागरपालिकेमार्फत रस्ते विकास कामे व दुरुस्तीची निविदा काढण्यात येत आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.